**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 18** **March - April - 2025**

# महिला सक्षमीकरणामध्ये सुकन्या समृध्दी योजनेचे योगदान

**कु. सोनाली पद्माकरराव गावंडे**
*संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र विभाग*
*भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव केंद्र क्र. 430*
*Corresponding Author – कु. सोनाली पद्माकरराव गावंडे*
**DOI - 10.5281/zenodo.15250583**

**प्रस्तावना :**

**'मुलगी शिकली, प्रगती झाली'**

या ब्रिदवाक्यामध्ये व्यापक अर्थ असा सामावलेला आहे. शिक्षण घेतलेली स्त्री पुढच्या पिढीला शिक्षणाचे संस्कार देऊन समाज प्रगतीशिल करण्यात नक्कीच मदत करते. प्रत्येक स्त्री आपले घर सांभाळणे आणि चालवणे यामध्ये सक्षम असतेच पण सुशिक्षित स्त्री मध्ये समाज परिवर्तन घडविण्याची ताकद असते.

पुर्विच्या काळी स्त्रीचे अस्तीत्व केवळ 'चुल आणि मुल' पर्यंतच मर्यादित होते. पण सावित्रीबाई फुले यांच्या प्रयत्नातून स्त्री शिक्षणाचा मार्ग सुकर झाला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय संविधानाने कलम 14, 15 अंतर्गत स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार बहाल केला आहे. कलम 21 नुसार स्वत:च्या जीवनाचे आणि स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा स्त्रीला हक्क मिळतो. आता असे एकही क्षेत्र नाही की जिथे स्त्रीने आपला ठसा उमटवलेला नाही. चांगले शिक्षण क्षेत्र निवडून यशाची पावले उंचावर पोहचायला स्त्री या कुठेही कमी पडत नाही.

" The world needs strong women, Women who will lift and build other, who will love and be loved. Women who live bravely, both tender and fierce, women of indomitable will.'
-Amy Tenney

**सुकन्या समृध्दी योजना :**

सुकन्या समृध्दी योजना मुलींचे शिक्षण, आरोग्य, लग्न तसेच त्यांचे उज्वल भविष्य इत्यादी उद्दिष्टे डोळया समोर ठेवून केंद्र सरकारने 22 जानेवारी 2015 रोजी सुरु केली. ही योजना केंद्र सरकारची महत्वाकांक्षी सर्वात कमी गुंतवणुकीची विशेष करुन मुलीसाठी बचत योजना आहे. मुलींचे आई-वडील एखाद्या राष्ट्रीयकृत बँकेत किंवा पोष्ट ऑफीस मध्ये बचत खाते उघडून या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

सुकन्या समृध्दी योजने अंतर्गत दरवर्षी किमान 250 रु. व अधिकतम 1.5 गुंतवणूक करुन यायोजनेचा लाभ घेता येतो. सुकन्या समृध्दी योजना खाते उघडल्या पासून ते मुलीचे वय 21 वर्षे पुर्ण झाल्यावर जमा रक्कम व्याजासहीत पालकांच्या स्वाधीन केली जाते व सदर खाते बंद केली जाते. आवश्यक असल्यास मुलीचे वय 15 वर्षे पूर्ण झाल्यावरच मुलीच्या उच्च शिक्षणासाठी तसेच तिच्या आरोग्यासाठी सुकन्या समृध्दी योजनेच्या खात्यातून फक्त 50 टक्के रक्कम काढता येईल.

**महिला सक्षमीकरणामध्ये सुकन्या समृध्दी योजनेचे योगदान :**

भारत सरकार महिलांच्या सशक्तीकरणासाठी अनेक योजना राबवित आहे. महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशिल आहे. महिलांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी काही क्षेत्रात आरक्षण देत आहे.

महिला सक्षमीकरणाचा सरळ अर्थ म्हणजे महिलांना स्वावलंबी आणि शक्तीशाली बनविणे, महिलांना अधिकार देऊन सामाजिक, आर्थिक, राजनैतिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सशक्त भागीदार बनविणे यासाठीच सुकन्या समृध्दी योजनेची निर्मिती केली जाते.

**महिलांच्या सृजनक्षमता विकसित करणे :**

महिलांची सक्षमीकरण झाल्यास राष्ट्राची भरभरात होते. कुटुंबाच्या आणि समाजाच्या निर्णय प्रक्रीयेत महिलांचा सहभाग वाढल्यास ता परिणामकारक ठरतो, स्त्रियांच्या सृजनक्षमतेचा विकास करण्यासाठी त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, त्यांना विज्ञान निष्ठ आणि व्यावसायाभिमुख करणे आवश्यक आहे.

**आर्थिक दृष्टया महिलांना सक्षम करणे :**

अर्थार्जनक्षमतेचा विकास महत्वाचा आहे प्रत्येक स्त्रीने अर्थार्जनाची क्षमता स्वयंरोजगारातून विकसित केली तर ती कोणत्याही परिस्थितीत अन्यायाचा प्रतिकार करु शकते. हे सुकन्या समृध्दी योजने व्दारे होऊ शकते.

**समाजात उच्च स्थान प्राप्त करणे :**

सामाजिक स्थान ही संकल्पना सामाजिक स्तरीकरण व्यवस्थेचा एक भाग आहे. शिक्षणाच्या संधी महिलांसाठी मोठया प्रमाणात खुल्या झाल्या पाहिजे. कारण पिढी घडवण्याचे काम पुरुषांपेक्षा स्त्रीच अधिक करत असते. स्त्री जो पर्यंत आर्थिकदृष्टया सक्षम होत नाही तोपर्यंत ती प्रगती करु शकत नाही. त्यासाठी तीला उच्च शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे.

**महिलांच्या¬ निर्णयक्षमतेचा विकास करणे :**

महिलांसाठी एक विकास योजना बनविणे महत्वाचे आहे. त्यांच्यामध्ये नेतृत्त्व आणि व्यावसायिक क्षमता विकसित करणे गरजेचे आहे. महिलांच्या स्थीतीमध्ये सकारात्मक बदल घडवून आणने, महिलांमध्ये उद्योगशिलता निर्माण करणे त्यामुळे त्यांची आर्थिक निर्भरता कमी होईल.

सुकन्या समृध्दी योजनेमळे महिलांमध्ये सकारात्मता निर्माण होणे महत्वाचे आहे. सोबतच त्यांच्यामध्ये असणाऱ्या वैशिष्ट्यांचा विकास करणे महत्वाचे आहे. या योजनेची वैशिष्ट्ये म्हणजे महिलांमध्ये निर्णय क्षमतेचा विकास करणे, स्वयं निर्णय घेण्याची क्षमतांचा विकास तेव्हाच होईल जेव्हा महिला सार्वजनिक क्षेत्रात बँक व्यवहार करणे, प्रशासनात भाग घेणे यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढेल. तसेच, त्यांच्यात कौशल्य क्षमतेचा विकास होईल, आर्थिक आत्मनिर्भरता येईल.

एकूण योजनेचा उद्देश म्हणजे सुकन्या समृध्दी योजने अंतर्गत ज्या मुलींचा आर्थिक कमकूवत असणाऱ्या कुटुंबांना मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये यासाठी हि योजना सुरू केल्या गेली आहे. मुलींच्या कल्याणासाठी तसेच, त्यांच्या उच्च शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे यासाठी ही योजना सुरू केली. याखात्यामुळे मुलींच्या शिक्षणाच्या खर्चाची व्यवस्था केली जाते. या योजने अंतर्गत मुलींच्या शिक्षण व विवाहासाठी या योजनेची सुरूवात केली जाते.

**संदर्भ सुची :**


1. पोस्ट कार्यालयातील माहिती पुस्तीका, 2022-23
2. सोमवंशी अनिक स्त्री-शिक्षणाची वाटचाल अमरावती, बोके प्रकाशन.
3. साखरकर कल्याण, भारतीय स्त्रीयांची साक्षरता.
4. हालन मोनिका 2021, पैशा विषयी बोलू काही, मधुश्री पब्लीकेशन, २५ मे २०२२